## ठराव

मा.ना.रामराजे नाईक-निंबाळकर, मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) व अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांचे अध्यक्षतेखाली व मा. ना. अजित पवार, मंत्री, जलसंपदा (कृखोपाम वगळून) यांचे उपस्थितीत नियामक मंडळाची ५०वी बैठक दिनांक २२.११.२००६ रोजी जलसंपदा विभागाचे सभागृह मुंबई येथे संपन्न झाली. सदर बैठकीत विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आले.

**ठराव क्र. ५०/१**

**"ठराव करण्यांत येतो की, नियामक मंडळाच्या ४९ व्या बैठकीत पारित झालेले ठराव क्र. ४९/१ ते ४९/६ व ४९/९ ते ४९/१६ कायम करण्यात येत आहेत. ठराव क्र. ४९/७ व ४९/८ बाबत बैठकीत स्वीकृती न मिळाल्याने हे दोन्ही ठ राव कायम करण्यात आले नाहीत."**

**ठराव क्र. ५०/२**

**"ठराव करण्यात येतो की, शासनाने मा.राज्यपाल यांना सादर केलेल्या जलसंपदा विभागाच्या रु.१६३४५ कोटीच्या नियोजनातील महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या रु.३१४५ कोटीच्या नियोजनास नियामक मंडळाची सहमती देण्यात येत असून रु.३१४५ कोटीच्या नियोजनात रु. १२४०.६३ कोटीच्या वाढीव नियोजनाचा समावेश करण्याबाबत नियामक मंडळ मान्यता देत आहे. या वाढीव नियोजनामुळे जलसंपदा विभागाच्या ३ वर्षाच्या रु. १६३४५ कोटीच्या नियोजनात उचित वाढ करुन त्यात महामंडळाच्या रु.३१४५ कोटी अधिक रू. १२४०.६३ कोटी अशा एकूण रु. ४३८५.६३ कोटीच्या नियोजनाचा समावेश करण्यासाठी नियामक मंडळाच्या वतीने शासनास शिफारस करण्यात येत आहे. "**

**ठराव क्र. ५०/३**

**"ठराव करण्यांत येतो की, सन २००५-०६ या वर्षापासून महामंडळाचे वार्षिक लेखे तयार करण्यासाठी लेखांकन पद्धतीत बदल करुन Accrual System ऐवजी Cash System पद्धतीने ठेवण्यास मान्यता देण्यांत येत आहे."**

**ठराव क्र. ५०/४**

**"ठराव करण्यात येतो की, सन २००५-२००६ या वर्षाचे प्रकल्प विकास पत्रक व ३१/३/२००६ अखेरचा ताळेबंद स्विकृत करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

**ठराव क्र. ५०/५**

**"ठराव करण्यात येतो की, सन २००४-०५ च्या नवव्या वार्षिक अहवालास वर्ष २००४-०५ मध्ये जून २००५ अखेर निर्मित सिंचन क्षमतेची माहिती अंतर्भूत करण्याच्या दुरुस्तीसह मान्यता देणेत येत आहे. तसेच हा अहवाल शासनामार्फत विधीमंडळास सादर करण्याच्या कार्यवाहीस नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

सही/-
मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म, पुणे

सही/-
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ५० वी बैठक दिनांक २२.११.२००६

ठराव क्र. ५०/६

"ठराव करण्यात येतो की, भीमा शैक्षणिक न्यास, पाटस यांना मौजे पाटस ता.दौंड, जिल्हा पुणे येथील ट्रेनिंग सेंटर वसतिगृहाची इमारत क्षेत्रफळ ५५८६ चौ.फूट रू. १.६० प्रतिमाह / प्रति चौ. फूट दराच्या २५ टक्के सवलतीच्या दराप्रमाणे रु.२६७२४/- वार्षिक भाडेपट्टयावर १-१ वर्षाच्या मुदतीने ५ वर्षाच्या मुदतीसाठी देण्यांस नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. सदर भाडे आकारणीचे दर पुनर्विलोकनाच्या अधिन राहतील. पुनर्विलोकनानंतर सदर भाडेदरात वाढ झाल्यास त्या दराने भाडेपट्टा अदा करणे संस्थेवर बंधनकारक राहिल."

ठराव क्र. ५०/७

"ठराव करण्यात येतो की, छत्रपती शिक्षण प्रसारक मंडळ, आरळे यांच्या तात्यासाहेब कोरे हायस्कुल, आरळे यांना विविध शैक्षणिक उपक्रम राबविण्यासाठी व वृक्ष लागवडीसाठी आरळे येथील गट क्र. ४३८ अ, २अ व ४२६ब मधील ४.९५ हेक्टर क्षेत्र सवलतीच्या दराने मासिक भाडे रुपये १०६५६३/- आकारुन १० वर्षाच्या कालावधीसाठी भाडेपट्टयाने देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ५०/८

"ठराव करण्यात येतो की, डिंभे वसाहतीतील मूळ करारनाम्याप्रमाणे व अतिरिक्त मागणीप्रमाणे एकूण ३३९४.०२ चौ.मीटर मोकळी जागा रुपये ४०९४७/- वार्षिक भाडेपट्टयाने (भाडेपट्टयात दरवर्षी १० टक्के वाढ करुन ) महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनीस ३० वर्षांच्या भाडेकराराने देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ५०/९

"ठराव करण्यात येतो की, महामंडळांतर्गत विविध प्रकल्पांच्या मृद सर्वेक्षण कामासाठी श्री.शि.मा. अमृतकर सेवानिवृत्त मृद शास्त्रज्ञ यांना एक वर्षाच्या करार पध्दतीने नियुक्ती देण्यासाठी द्यावयाच्या दरमहा रुपये ७२७६/- पारिश्रमिक वेतनापोटी एक वर्षाचे पारिश्रमिक वेतन रु. ८७३१२/- पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय पुणे यांना अदा करण्यास महामंडळाकडून निधी उपलब्ध करुन देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ५०/१०

"ठराव करण्यात येतो की, बारामती ॲग्रो लिमिटेड, बारामती यांना निरा डावा कालवा किमी. ८४/८०० मधील मौजे पिंपळी येथील १३२० चौ.मी. मोकळी जागा केवळ वाहनतळाचे कारणासाठीच वापरण्यात यावी व या जागेवर कोणतेही बांधकाम करण्यात येणार नाही या अटीचे अधिन राहून रु. १०००/- वार्षिक भाडेपट्टयाने (भाडेपट्टयात दरवर्षी १० टक्के वाढ करुन ) प्रथमतः दहा वर्षासाठी देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे"

सही/-
मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म, पुणे



सही/-
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ५० वी बैठक दिनांक २२.११.२००६

ठराव क्र. ५०/११

"ठराव करण्यात येतो की, मौजे वेनवडी ता.भोर येथील प्राथमिक शाळेसाठी खालील गट क्रमांकामध्ये दर्शविलेली ५४ आर जमिन सदर जमिनीची किंमत रु. ९२३७७/- महामंडळास मिळण्याचे अटीवर जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे वर्ग करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

| अ.नं. | गट क्रमांक | एकूण संपादित क्षेत्र (हे.आर) | शाळेसाठी (कालवा वगळून ) उपलब्ध होणे योग्य क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|---|
| १ | १७५ | ०.०१ | ०.०१ |
| २ | १७४ | ०.०४ | ०.०४ |
| ३ | १७६ | ०.०९ | ०.०७ |
| ४ | १७८ | ०.२० | ०.१३.७ |
| ५ | ३०७ | ०.३० | ०.०४ |
| ६ | ३०८ | ०.३५ | ०.०७.८ |
| ७ | ३९४ | ०.०१.५ | ०.०१.५ |
| ८ | ६७३ | ०.६६ | ०.१५.१ |
| | | एकुण ... | ०.५४.१ |

ठराव क्र. ५०/१२

"ठराव करण्यात येतो की, चांदोली धरणासाठी संपादित केलेल्या १३०.२ हे. जमिनीपैकी ८५.३४ हे. अतिरिक्त जमिन मूळ मालकांस परत करण्याबाबतची मागणी अमान्य करण्यात येत आहे. अतिरिक्त जमिनींचा पर्यटन विकास किंवा अन्य व्यावसायिक प्रयोजनासाठी उपयोग करण्याबाबतचा आढावा अधीक्षक अभियंता कोल्हापूर पाटबंधारे मंडळ, कोल्हापूर यांनी घेवून तसा प्रस्ताव महामंडळास सादर करावा."

ठराव क्र. ५०/१३

"ठराव करण्यात येतो की, पवना प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीपैकी पूररेषेच्या बाहेरील शिल्लक राहिलेली १०११ एकर जमिन सोबतच्या गावनिहाय यादीतील ८६३ खातेदारास प्रत्येकी एक एकर याप्रमाणे प्रथमतः १० वर्षाकरिता रु. २०००/- प्रति हेक्टर / प्रतिवर्ष दराने व महामंडळाच्या प्रचलित अटी शर्तीनुसार तसेच प्रकल्पाची कामे बंद पाडणार नाही या अटी अधीन कसण्यासाठी भाडेपट्टयाने देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे ".

ठराव क्र ५०/१४

"ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांचे अधिपत्याखालील वारणा प्रकल्प चांदोली अभयारण्यातील मौजे पेटलोंड ता.शिराळा येथील ७७ खातेदारांना त्यांच्या घरांच्या किंमती अदा करणेसाठी रु. ८६.७९ लक्ष रक्कमेच्या मूल्यांकन प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे ".

सही/-
मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म, पुणे



सही/-
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे